

# दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., कोल्हापूर

मुख्य कार्यालय : १०३१, क -२, ई वॉर्ड, शाहुपूरी गवत मंडई,
कोल्हापूर - ४१६ ००१

## ८३ व्या सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

या बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, सन २०२०-२०२१ या सालची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० जुलै २०२१ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचने नुसार शनिवार दि. ११/०९/२०२१ इ.रोजी दुपारी १.०० वाजता, ऑनलाईन (Video Conferancing)द्वारे खालील विषयावर चर्चा करुन मंजूर करणेकरिता आली आहे. तरी सर्व सभासदांनी **Shikshakbankkopagm2021.ruha.co.in** या लिंक द्वारे व्हिसी सभेस उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### * सभेपुढील विषय *

१. मागील दि. ०७/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२०-२१ सालचा वार्षिक अहवाल,ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून स्विकृत करणे.
३. सन २०२०-२१ सालच्या शासकीय लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे व स्विकृत करणे.
४. मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल वाचन करणे व स्विकृत करणे.
५. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२०-२१ सालच्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
६. सन २०२१-२२ सालाकरिता मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७. सन २०२०-२१ सालात मंजूर बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८. सन २०२१-२२ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे तसेच सन २०२१-२२ सालासाठी नेमलेल्या अंतर्गत लेखापरीक्षक नेमणूक व त्यांचा मेहेनताना यास कार्योत्तर मंजुरी देणे.
९. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिती विचारात घेणे.
१०. बँकेच्या पोटनियमानुसार भागभांडवल दर्शनी किंमत रु. ५००/- च्या पटीत करणे बाबत विचार करणे.
११. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेमणुकीबाबत.
१२.अंगणवाडी सेविका व इतर पेन्शनर यांना नाममात्र (ब वर्ग) सभासद करुन त्यांना कर्ज देणे बाबत विचार करणे.
१३.वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस क्षमापित करणे.
१४. मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरून

स्थळ : कोल्हापूर
तारीख : १९/०८/२०२१

श्री. राजेंद्र आ. चौगुले
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी

*** विशेष सचूना**

१) सभेच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी सभासदांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर स्वतंत्र लिंक पाठविण्यात येईल. त्यानुसार लॉगिन केले नंतर आपली उपस्थिती ग्राह्य धरली जाईल.

२) सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून मोबाईल क्रमांक, ई-मेल, व्हॉट्सॲप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाचीच नोंद करावी म्हणजे आपणास ऑनलाईन सभेची लिंक पाठविणे सोपे होईल.

३) सन्माननिय सभासदांनी सभेपुढील ठेवावयाच्या आपल्या लेखी सुचना बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे दि. ०६/०९/२०२१ इ. च्या अगोदर पाठवाव्यात.